# ममदापूरला कृषी विभागाच्यावतीने शेतीदिन व बिजोत्पादन




**राहाता (तालुका प्रतिनिधी)–** राहाता तालुक्यातील ममदापूर येथे शेतकरी शेती दिन व ग्रामबिजोत्पादन कार्यक्रम नुकताच संपन्न झाला. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, तसेच उपविभागिय अधिकारी विकास गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली व तालुका कृषी अधिकारी आबासाहेब भोरे यांच्या अध्यक्षतेखाली ममदापूर येथे अन्न व पोषण सुरक्षा अभियान अंतरपिक व्यापारी पिके अंतर्गत ऊस व हरभरा पीक प्रात्यक्षिक शेती दिन पार पडला.

याप्रसंगी आबासाहेब भोरे यांनी ग्रामबिजोत्पादन, ॲग्रीस्टॅक विषयी मार्गदर्शन केले. महाबिज अकोले यांचे अधिकारी युवराज काशिद यांनी बिजोत्पादन बियाणे साठवण याविषयी मार्गदर्शन केले. कृषी सहायक संध्या महागडे यांनी कृषी विभागाच्या विविध योजना विषयीची माहिती दिली. याप्रसंगी वाकडी, ममदापूर परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पांडूरंग ससाणे, पाराजी आहेर, रहाणे, दिपक आदक, राहुल गोरे, कृषी पर्यवेक्षक अडसूरे, कृषी सहायक लाटे, चौधरी, पुंड, निमसे, जाधव आदी उपस्थित होते.

# तेलंगणात बोगद्याचे छत कोसळले; ८ कामगार अडकले

**नागरकुरनूल–** तेलंगणातील नागरकुरनूल जिल्ह्यात शनिवारी (दि.२२) श्रीशैलम डावा किनारा कालव्याच्या (श्रीशैलम लेफ्ट बँक कॅनॉल– एसएलबीसी) प्रकल्पाच्या बांधकाम सुरू असलेल्या भागातील १४ व्या किमी अंतरावर या बोगद्याचे छत कोसळले. घटनेत किमान ८ कामगार अडकले आहेत. या दुर्दैवी घटनेच्या चार दिवस आधी बोगदा उघडण्यात आला होता. दरम्यान, बांधकाम कंपनीचे पथक मूल्यांकनासाठी आत गेले आहे. बचाव कार्य सुरू करण्यात आले आहे.




राज्याचे पाटबंधारे मंत्री एन उत्तम कुमार रेड्डी यांनी नुकतेच मझढखफला सांगितले, श्रीशैलम लेफ्ट बँक कॅनाल (डङइउ) प्रकल्पाच्या बांधकामाधीन बोगद्यात छताचा एक भाग कोसळल्यानंतर अडकलेल्या आठ कामगारांना वाचवण्यासाठी सरकार सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. राज्य सरकारने एनडीआरएफला बचाव कार्यात सामील होण्याची विनंती केली आहे. घटनेनंतर तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांनी अधिकाऱ्यांना घटनास्थळी धाव घेण्याचे आणि बचाव कार्य सुरू करण्याचे निर्देश दिले आहेत. मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयाने काही व्यक्ती जखमी झाल्याचे निवेदन जारी केले, परंतु त्यांची नेमकी संख्या सांगितली नाही. मुख्यमंत्र्यांनी जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक आणि इतर अधिकाऱ्यांना मदत कार्यात समन्वय साधण्यासाठी अपघातस्थळी जाण्याचे निर्देश दिले आहेत.

मुख्यमंत्र्यांच्या सूचनांनुसार, राज्याचे पाटबंधारे मंत्री एन उत्तम कुमार रेड्डी, सरकारी पाटबंधारे सल्लागार आदित्यनाथ दास आणि इतर पाटबंधारे अधिकारी एका विशेष हेलिकॉप्टरने घटनास्थळी रवाना झाले होते. केंद्रीय कोळसा मंत्री जी किशन रेड्डी यांनी अपघाताबद्दल चिंता व्यक्त केली, त्याच्या कारणाची माहिती घेतली आणि अडकलेल्या व्यक्तींना वाचवण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले. त्यांच्या कार्यालयाने एक निवेदन जारी केले, ज्यामध्ये असे म्हटले आहे की त्यांनी कोणत्याही जखमींना योग्य वैद्यकीय सेवा देण्याचे निर्देश दिले आहे.

अडकलेल्या कामगारांना वाचवण्यासाठी सरकारी मालकीच्या कोळसा खाण कंपनी, सिंगारेनी कोलियरीज कंपनी लिमिटेडचे १९ सदस्यीय पथक देखील घटनास्थळी रवाना झाले आहे.

कंपनीच्या एका उच्च अधिकाऱ्याच्या मते, अशा घटनांमध्ये लोकांना वाचवण्यात एससीसीएलकडे तज्ज्ञ आहेत आणि त्यांच्याकडे आवश्यक उपकरणे देखील आहेत. कंपनीच्या बचाव पथकाचे नेतृत्व महाव्यवस्थापक स्तरावरील अधिकाऱ्याकडे आहे.

छत कोसळण्यासारख्या गंभीर परिस्थिती हाताळण्यासाठी एससीसीएलकडे आवश्यक कौशल्य आहे. तसेच आमच्याकडे ऑस्ट्रेलिया, अमेरिका आणि पोलंडमधून आयात केलेली आवश्यक उपकरणे देखील आहेत. यंत्रसामग्री आणि रॉक कटर इतके प्रगत आहेत की ते काही मिनिटांतच मोठे खडक आणि दगड कापू शकतात, असे एससीसीएलचे सीएमडी एन बलराम यांनी पीटीआयला सांगितले.

# नियंत्रण रेषेवर झाली भारत-पाक ध्वज बैठक

**जम्मू–** जम्मू-काश्मीरच्या पूंछ जिल्ह्यातील नियंत्रण रेषेवर भारत आणि पाकिस्तान यांच्यात ध्वजबैठक झाली. अलीकडे सीमेपलीकडून करण्यात आलेल्या गोळीबाराच्या घटना आणि आयईडीचे घडविण्यात आलेल्या स्फोट यामुळे निर्माण झालेला तणाव निवळण्यासाठी ही बैठक आयोजित करण्यात आली.



चाकण-दा-बाग येथे ब्रिगेड-कमांडर स्तरावरील ही बैठक होती, सीमेवर शांतता राखण्याची गरज यावेळी दोन्ही बाजूंकडून व्यक्त करण्यात आली. ही बैठक जवळपास दीड तास सुरू होती. खेळीमेळीच्या वातावरणात पार पडलेल्या बैठकीमध्ये शस्त्रसंधी कराराचे पालन करण्याचे दोन्ही बाजूंनी मान्य केले. गेल्या अनेक वर्षांपासून भारत आणि पाकिस्तानमध्ये फ्लॅग मिटींग झालेली नाही. शेवटची ध्वज बैठक २०२१ मध्ये झाली होती. त्यामुळेच ही बैठक खूप महत्वाची होती. बैठकीत २०२१ पासून नियंत्रण रेषेवर सुरू असलेला युद्धविराम कायम ठेवणे, नियंत्रण रेषेला तणावमुक्त करणे यासह इतर अनेक मुद्द्यांवर चर्चा करून एकमत झाले. भारताकडून पूंछ ब्रिगेडचे कमांडर आणि पाकिस्तानी लष्कराच्या दोन पाकिस्तानी ब्रिगेडचे कमांडर बैठकीत सहभागी झाले होते.

**एलओसीवर घडणाऱ्या घटनांमुळे चिंता**

नियंत्रण रेषेवर तणाव वाढवण्यासाठी पाकिस्तान सातत्याने कट रचत आहे. काही दिवसांपासून एलओसीवर मोठ्या प्रमाणावर शस्त्रसंधीचे उल्लंघन होत आहे. बुधवारी एलओसी ओलांडून राजौरीमध्ये भारतीय हद्दीत गोळीबार करण्यात आला. पाकिस्तानच्या या कृत्याला भारतानेही चोख प्रत्युत्तर दिले. ११ फेब्रुवारी रोजी जम्मू जिल्ह्यातील नियंत्रण रेषेच्या अखनूर सेक्टरमध्ये आयईडीफ स्फोटात एका कॅप्टनसह दोन जवान शहीद झाले होते.

# बांगलादेशातील दहशतवाद्यांचे सरकार संपवणार- शेख हसीना

**नवी दिल्ली–** बांगलादेशच्या पदच्युत पंतप्रधान शेख हसीना यांनी मुहम्मद युनूस यांच्या नेतृत्वाखालील अंतरिम सरकारवर जोरदार टीका केली. लवकरच बांगलादेशात परतून दहशतवाद्यांचे सरकार उलथून लावण्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केला.

अवामी लीगचे अध्यक्ष नजरुल इस्लाम यांनी व्हर्च्युअल कॉन्फरन्स आयोजित केली होती. त्यामध्ये सहभागी होताना शेख हसीना यांनी मुहम्मद युनूस सरकारवर जोरदार टीका केली. युनूस यांनी बांगलादेशला



दहशतवादाचा अड्डा बनवले आहे. युनूस यांना सरकार चालवण्याचा अनुभव नाही. त्यांनी सर्व तपास समित्या विसर्जित केल्या आणि दहशतवाद्यांना खुले सोडले, असा आरोप त्यांनी यावेळी केला.

मुहम्मद युनूसने आपल्या अंतरिम सरकारमध्ये एका तथाकथित विद्यार्थी नेत्याचा समावेश केला आहे. तो म्हणतो, पोलिसांना मारल्याशिवाय आंदोलन होऊ शकत नाही. ही अराजकता संपवायची आहे. देशाची पुन्हा सेवा करण्यासाठीच अल्लाहने मला हिंसाचारातून वाचवले. मी लवकरच परत येईन आणि हे दहशतवाद्यांचे सरकार पाडेन, तोपर्यंत देशातील सर्व नागरिकांनी शांत आणि एकजूट राहावे. मी परत आल्यावर शहिदांचा बदला घेईन आणि पूर्वीप्रमाणेच न्याय्य सरकार चालवेन, असेही त्या म्हणाल्या.

पान १ वरुन

## राज्यातील जनतेकडून खऱ्या-खोट्याचा निर्णय

चांगले काम केले आहे. अटल सेतू हा एक चमत्कारच आहे. अनेक क्षेत्रात मोठी कामे सुरू आहेत. म्हणूनच महाराष्ट्राच्या जनतेने महायुतीला ऐतिहासिक बहुमत दिले. पण, त्याबरोबरच कोणती शिवसेना खरी आहे आणि कोणती राष्ट्रवादी खरी आहे हेही दाखवून दिले आहे. जनधन खाती आम्ही सुरू केली त्यावेळी राहुलबाबा म्हणाले होते, की खाती सुरू केली, पण पैसे कुठे आहेत? आज एकाच दिवशी, एकाच वेळी २० लाख जणांच्या खात्यात पैसे जमा झाले. हा मोदींचा चमत्कार आहे राहुलबाबा, असा टोलाही त्यांनी लगावला.

फडणवीस म्हणाले, शहा यांनी बटण दाबले आणि लोकांच्या खात्यात पैसे जमा व्हायला लागलेत, मेसेजेस येत आहेत. १३ लाख ५७ हजार घरे पहिल्या व दुसऱ्या टप्प्यात २० लाख घरे मोदींनी दिली. १०० दिवसांत २० लाख घरांना मान्यता मिळावी सांगितले आणि फक्त ४५ दिवसात काम केले. त्यातील १० लाख घरांना पहिला हप्ता वितरित करण्यात आला आहे. पवार म्हणाले, महामानवांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचे काम केंद्र सरकार करते आहे. हा कार्यक्रम त्याचाच एक भाग आहे. प्रत्येकाचे घराचे स्वप्न असते. पंतप्रधान मोदी २ कोटी घरे देशात देणार आहेत. त्यातील मोठा वाटा राज्याला मिळावा, असा आमचा प्रयत्न आहे. शिंदे म्हणाले, प्रधानमंत्री मोदी खरी महाशक्ती आहेत. देशाला ते विकासाच्या वाटेवर घेऊन जाणार आहेत.

## ‘गायरान’मधील घरकुलांसाठी गावठाण विस्तारीकरण करा

हप्ता वितरण सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर यांच्यासह भाजपचे नेते उपस्थित होते. यावेळी मंत्री विखे पाटील म्हणाले, गावठाण विस्तारात गायरान जमिनीमध्ये घरकुलांसाठी जागा देऊ शकतो. जिल्हा परिषदेने संबंधित सरपंच, ग्रामसेवक यांना पुढाकार देऊन गावठाण विस्ताराचा विषय मंजूर करुन घ्यावा. संबंधीत घरकुलाच्या नोंदी करुन घ्याव्यात. आपले घर काढले जाणार आहे का? आपण विस्थापित होणार का? या भीतीने गायरान जागेतील घरकुल लाभार्थी घाबरलेले आहेत. शेती महामंडळाच्या जमिनी श्रीरामपूर, राहाता आणि कोपरगाव तालुक्यातील ग्रामपंचायतींना गावठाण विस्तार करुन दिल्याने या ठिकाणी असणाऱ्या घरकुलांना जागा उपलब्ध झाल्या आहेत.

जिल्ह्याचे ८२ हजार घरकुलांचे उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी विशेष मोहीम हाती घेण्याची गरज आहे. १०० दिवसांच्या कार्यक्रमात सर्व बीडीओ, गटविकास अधिकारी, क्षेत्र अधिकारी, ग्रामविस्तार अधिकारी, तलाठी, ग्रामसेवक, मंडळ अधिकारी यांना शासकीय जागा किती उपलब्ध आहे याची माहिती देऊन घरकुल पूर्ण करण्याचे उद्दिष्टे देण्याची गरज आहे. यामुळे अनेकांना घरकुलांसाठी जागा उपलब्ध होईल, असेही विखे पाटील म्हणाले.

**धनदांडग्यांची अतिक्रमणे काढून टाका**

शासकीय जागा अडगळीत पडल्या आहेत. गावात गरिबांना राहायला जागा नाही. धनदांडग्यांनी सरकारी जागेत इमारती बांधून ठेवल्या आहेत. गरिबांना निवारा मिळण्यासाठी अशी अतिक्रमणे काढून टाकावी लागणार आहेत. शासनाची कोणतीही योजना बंद होणार नाही. विरोधकांकडे मुद्दा राहिलेला नाही. त्यामुळे योजना बंद करण्याची दिशाभूल करुन लोकांची फसवणूक करत आहेत, अशी टीका ना.विखे पाटील यांनी केली.

## नगरमध्ये जमीन व्यवहारात अडीच कोटींची फसवणूक

अनिता पीटर पाटोळे उर्फ अनिता दीपक वाघमारे, क्रांती पीटर पाटोळे, प्रियंका पिटर पाटोळे उर्फ प्रियंका संदीप खंडागळे सर्व रा. ख्रिस्ती गल्ली तारकपूर यांच्याविरुद्ध कलम ४२०, ४१७, १२० ब प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना जुलै २०२१ ते ३१ ऑगस्ट २०२३ दरम्यान अप्पू हत्ती चौक परिसर लालटाकी येथे व इतर ठिकाणी घडलेली असल्याचे तक्रारीत नमूद केले आहे.

जयप्रकाश धूत यांनी फिर्यादीत म्हटले आहे की, ४ फेब्रुवारी २०२० रोजी न्यायालयाने रेगुलर सिव्हिल अपील क्रमांक ३२८/२०१५ चा निकाल देऊन पूर्वी पवन पाटोळे व इतरांच्या बाजूने न्यायालयाने दिलेला १८२/ २००३ मधील निकाल रद्द केला. याची पूर्ण कल्पना असतानाही केवळ महापालिकेकडून नमूद क्षेत्रास सिटी सर्वे दप्तरी त्यांचे नाव लावण्यास उशीर झाल्याचा गैरफायदा घेऊन आरोपींनी कट कारस्थान करून सदरची जमीन त्यांच्या नावावर आहे, असे आम्हाला भासवून त्यांच्या मालकीची नसलेली जमीन आम्हाला ४ ऑक्टोबर २०२२ रोजी दुय्यम निबंधक कार्यालय वर्ग दोन येथे खरेदी खत दस्त क्रमांक ८२३८/२०२२ अन्वये विक्री केली. त्या बदल्यात आमच्याकडून वेळोवेळी दोन कोटी ६६ लाख ६२ हजार ८०० रुपये घेऊन आमची फसवणूक केली. या घटनेचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सचिन रणशेवरे करत आहेत.

## निकृष्ट व नियमबाह्य कामांची बिले देण्यास ११ संचालकांचा विरोध

बेलापूर आणि टाकळीभान उपबाजारात सुरु असलेली कामे ही नियमबाह्य व निकृष्ट दर्जाची असल्याचा ठपका ठेवला आहे.

या कामांची निविदा देताना पणन संचालकांनी घालुन दिलेल्या शर्ती व अटींचे पालन केले नाही. शासकीय नियमावली डावलुन वाढीव इस्टीमेट करण्यात आले. विकास कामे विकास आराखड्यात समाविष्ट करुन प्राधिकरणाच्या सक्षम अधिकाऱ्याची मंजुरी घेण्यात आली नाही. याबाबत मासिक बैठकीत चर्चा न करता बेकायदा मंजुरी दाखवून इतिवृत पुस्तिकेत नियमबाह्य नोंद घेतली आहे. अद्याप ही कामे अपूर्ण असताना त्यास अंतिम मंजुरी घेण्याचा प्रयत्न होत आहे.असाही आरोप त्यांनी विद्यमान सभापती व प्रभारी सचिव यांच्यावर केला आहे. या पत्रावर उपसभापती अभिषेक खंडागळे, संचालक नानासाहेब पवार, सुनील शिंदे, गिरीधर आसने, सरला बडाख, किशोर बनसोडे, सोन्याबापू शिंदे, दशरथ पिसे, मयुर पटारे, दिपक हिवराळे, जितेंद्र गदिया यांच्या सह्या आहेत.

**अविश्वास आणता येत नसल्याने त्रास देण्याचा प्रयत्न– नवले**

- याबाबत बाजार समितीचे सभापती सुधीर नवले यांना विचारले असता ते म्हणाले, काल बाजार समितीची मासिक सभा ११ वाजता होती. मात्र, ११.३० वाजेपर्यंत कोरम एवढे संचालक उपस्थित न राहिल्याने ११.३० ला आपण सभा तहकूब केली. त्यानंतर १२ वाजता विरोधी संचालक आले. त्यांनी सभा घेण्याची मागणी केली. त्या ११ संचालकांनी जे पत्र दिले आहे. ते वास्तविक पाहता पणन संचालकांना द्यायला पाहीजे होते. ज्या २ कामांवर त्यांचा आक्षेप आहे त्या दोन्ही कामांची पणनकडून मंजूरी घेतल्यानंतर त्या कामाचे टेंडर ओपन केलेले आहे. वर्कऑर्डर दिलेली आहे. या दोन्ही वेळेस आता विरोध करणाऱ्या संचालकांच्या सह्या आहेत. या कामाला विरोध होता तर त्यावेळी त्यांनी विरोध का केला नाही? असा सवाल उपस्थित करुन सभापती नवले म्हणाले, ठेकेदाराने चांगले काम केले आहे आणि काम पूर्ण झालेले असल्याने त्यांना पैसे देणे गरजेचे आहे. परंतू, आणखी ६ महिने तरी आपल्यावर अविश्वास ठराव आणला जाऊ शकत नसल्याने आपल्याला त्रास देण्याचा हा प्रयत्न असल्याचे श्री. नवले यांनी म्हटले आहे.

## योगेश वाघमारे खून प्रकरणात ६ आरोपींना जन्मठेप

करून जबर मारहाण केली. रवी कटारनवरे याने योगेश वाघमारे यांच्या छातीत तलवारीने तसेच संजय निकाळे, ललित बाबासाहेब पाळंदे यांनी कोयत्याने डोक्यात व हाताच्या बोटावर वार करून योगेश वाघमारे याला जीवे ठार मारले तर साक्षीदारांना जखमी केले. अशा आशयाच्या फिर्यादीवरून राहाता पोलीस स्टेशनला गुरंन २४३/२०२२ भादंवी कलम ३०२, ३६३, ३२४, १४३, १४७, १४८, १४९, ५०४, ५०६ आर्म ॲक्ट ४/२५ प्रमाणे एकूण १८ आरोपी विरोधात गुन्हा दाखल केला होता.

सदर गुन्ह्याचा तपास तत्कालीन पोलीस निरीक्षक सुनील गायकवाड यांनी करून न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले होते. या गुन्ह्याची सुनावणी अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय राहाता यांच्यासमोर झाली. या खटल्यात सरकार पक्षातर्फे ९ साक्षीदार तपासण्यात आले. खटल्यातील प्रत्यक्षदर्शी साक्षीदार व इतर साक्षीदारांच्या साक्षी महत्त्वाच्या ठरल्या. सबळ पुरावा व सरकारी वकिलांचा युक्तिवाद ग्राह्य धरून १८ आरोपींपैकी राहुल एकनाथ धीवर, ललित बाबासाहेब पाळंदे, रवी दशरथ कटारनवरे, विरेन उर्फ पिंटू दशरथ कटारनवरे, विशाल मायकल मोकळ, योगेश संजय निकाळे सर्व रा. आंबेडकरनगर या सहा जणांना अतिरिक्त सत्र व जिल्हा न्यायालयाने जन्मठेप व प्रत्येकी ३५ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. सरकार पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता डी. बी. पानगव्हाणे, पी. व्ही. बुलबुले यांनी काम पाहिले. त्यांना सरकारी अभियोक्ता मयुरेश नवले यांनी सहाय्य केले.

## शिक्षेची प्रत मिळताच कोकाटेंवर कारवाई

स्पष्ट केले. काँग्रेसचे तत्कालीन आमदार सुनील केदार यांना बँक घोटाळ्याप्रकरणी दोषी ठरवल्यानंतर दुसऱ्याच दिवशी त्यांच्यावर अपात्रतेची कारवाई करण्यात आली होती. विधिमंडळ सचिवालयाने तशी अधिसूचनाही काढली होती. तत्पूर्वी राहुल गांधी यांचे लोकसभेचे सदस्यत्वही अशाच पद्धतीने २४ तासांत रद्दबातल करण्यात आले होते. पण माणिकराव कोकाटेंच्या बाबतीत अद्याप अशी कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, असा आरोप काँग्रेसने केला आहे.

**राजीनामा मागणे हेच विरोधकांचे काम**

मंत्री कोकाटे यांनी शिक्षेच्या प्रकरणात यापूर्वीच खुलासा केलेला आहे. हा खटला ३० वर्षापूर्वी दाखल असून विरोधकांनी राजीनाम्याची मागणी करणे हे त्यांचे कामच आहे. सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात प्रकरणात यापूर्वीच सरकारने एसआयटी स्थापन केलेली असून चौकशी पूर्ण होण्यापूर्वी मंत्री धनंजय मुंडे यांना आरोपीच्या पिंजऱ्या उभे करणे बरोबर नाही, असे मत मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केले आहे.

## तिजोरीतील पैसे संपत आले म्हणून लाडक्या बहिणीला निकष

येत आहेत. ते म्हणाले की, पुणे, मुंबई, ठाणे या मोठ्या शहरांत झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांच्या माध्यमातून गरिबांना पक्की घरे मिळत आहेत. सुरुवातीला १८० चौरस फुटाची घरे मिळत होती. त्यानंतर २४५ आणि आता ३०० चौरस फुटाची घरे मिळत आहेत. मात्र, आम्ही राज्य शासनाकडे कमीत ४५० चौरस फुटाची घरे असावीत, असा प्रस्ताव दिला आहे.

**राज ठाकरे महायुतीत नकोत**

आठवले म्हणाले की, मनसेचे प्रमुख राज ठाकरे यांना मुख्यमंत्री एकदा भेटले ते ठीक. मात्र, त्यांना वारंवार भेटणे हे काही बरोबर नाही. राज ठाकरे यांना महायुतीत घेणे बरोबर नाही. तसेही त्यांचा महायुतीला काय फायदा होत नाही. ते आले तर आम्हाला काय मिळणार? मित्रपक्षांनी आम्हाला विचारात घेतले पाहिजे.

## पोलिसांना मिळणार ३२० फ्लॅट ११५ कोटींच्या निधीस मंजुरी

नवे ३२० फ्लॅट बांधण्यासाठी ११५ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. या कामाच्या मंजुरीची वर्क ऑर्डर महाराष्ट्र राज्य पोलिस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाने काढली आहे. जिल्ह्यातील पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी ही मोठी आनंदाची बातमी आहे. आता त्यांना लवकरच नवे घरे मिळतील, अशी माहिती आविष्कार ग्रुपचे मनोजकुमार जाधव यांनी दिली.

## सुरक्षीत शिर्डीसाठी सर्वांनी पाठबळ द्यावे

सूचना देण्यात आल्या आहेत. शिर्डीतील गुन्हेगारीबाबत अनेक आरोप-प्रत्यारोप झाले. मात्र तेथील गुन्हेगारी संपुष्टात आणणे याला प्राधान्य आहे. शिर्डीत गुन्हेगार, अवैध व्यावसायिक यांचे तेथील अधिकाऱ्यांसमवेत हितसंबंध असल्याच्या आरोपाकडे लक्ष वेधले असता, केवळ हितसंबंधच नव्हे तर त्यांना आश्रय देणारेही शिर्डीतीलच आहेत. गेल्या काही दिवसांतील शिर्डीतील घटना पाहिल्यानंतर आता या सर्वांचेच डोळे उघडले आहेत. आश्रय देणाऱ्यांसह शिर्डीतील ग्रामस्थांनाही या घटनांनंतर एकूण गांभिर्य लक्षात आले आहे. त्यामुळे गुन्हेगारी नष्ट करण्याची मानसिकता आता शिर्डीतील प्रत्येकाची झाली आहे. कोणत्याही प्रकारचा अवैध प्रकार, गुन्हेगारी सहन केली जाणार नाही. फक्त शिर्डीच नव्हे तर जिल्ह्यात कुठेच हा प्रकार खपवून घेतला जाणार नाही. शिर्डीत आता सर्वांनी एकत्रित प्रयत्न करून तेथील गुन्हेगारी समूळ नष्ट करण्याचा निर्णय घेतला आहे.

जिल्ह्यातील अतिक्रमण मोहिमेसंदर्भात विचारलेल्या प्रश्नांवर मंत्री विखे पाटील म्हणाले, या संदर्भात मी आढावा घेणार आहे. जिल्ह्यात कुठे मोहीम राबवली गेली, कुठे अतिक्रमण आहेत याची माहिती घेण्यात येणार आहे. अनेक ठिकाणी सरकारी जागा बळकावून तेथे इमारती बांधल्या गेल्या आहेत. हा प्रश्न फक्त नगर जिल्ह्यापुरता मर्यादित नसून, राज्याचा आहे. त्यासाठी एक वेगळे धोरण ठरवावे लागेल, असे मंत्री विखे पाटील म्हणाले.

**रेल्वेबाबत आधी जिल्हास्तरावर आढावा**

नगर पुणे इंटरसिटी रेल्वे, छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानग ते पुणे रेल्वे, माळशेज रेल्वे आणि नाशिक पुणे रेल्वे याबाबत जिल्हा पातळीवर माहिती घेवून या विषयावर एकत्रित रेल्वे मंत्री यांच्याकडे पाठपुरावा करून नव्याने सुरू होणाऱ्या वंदे भारतसह अन्य रेल्वे गाड्यांना नगर येथे थांबा मिळावा, यासाठी मागणी करणार असल्याचे मंत्री विखे पाटील यांनी सांगितले.

**सत्तेच्या विकेंद्रीकरणाला ते घाबरतात**

संगमनेर येथील अपर तहसील कार्यालय निर्मितीचा प्रश्न सध्या गाजत आहे. त्यावरून आरोप-प्रत्यारोप होत आहेत. या संदर्भात मंत्री विखे पाटील म्हणाले, संगमनेर तालुक्यातील आश्वी, घारगाव येथे अपर तहसील कार्यालय करण्याची मागणी आहे. लोकांच्या सोयीनुसार निर्णय घेतला जाईल. मात्र त्यापूर्वी महसूल मंडळांची पूनर्रचना करण्यात येणार आहे. यातून सत्तेचे विकेंद्रीकरण होईल अशी भीती काहींना आहे, असा टोलाही त्यांनी माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांना नाव न घेता लगावला.

## ग्रामपंचायतीचे ‘आपलं सरकार’ कात टाकणार!

योजना आणि दाखले उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यादृष्टीने राज्य सरकार आणि महाआयटी विभागाच्या हालचाली सुरू आहेत. यासाठी जिल्ह्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीला महाआयडीकडून स्वतंत्र युजर आयडी देण्यात येणार आहे. ग्रामपंचायतीमध्ये सुरू असणाऱ्या आपलं सेवा केंद्र या नव्या युजर आयडीमार्फत हे काम सुरू राहणार आहे. यापूर्वी ग्रामपंचायतीमध्ये मंजूर असणाऱ्या आपलं सरकार पोर्टलवर जन्म, मृत्यूसह अन्य सात प्रकारचे दाखले देण्यात येत होते. मात्र हे काम आता वाढविण्यात येणार आहे. तसेच खाजगी आपलं सरकार केंद्र आणि सेतू केंद्रामार्फत देण्यात येणाऱ्या ९६९ सेवा आणि विविध दाखल्यांपैकी जवळपास सर्व कामे ही आता ग्रामपंचायतची आपलं सरकार पोर्टल मार्फत करण्यात येणार आहेत.

साधारण पुढील महिन्यापासून ग्रामपंचायतमध्ये ही सेवा उपलब्ध होणार असून यासाठी ग्रामपंचायतींचे स्वतंत्र यूजर आयडी काढणीचे काम सुरू आहे. जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतीची यादी जिल्हा पातळीवरी महाआयटी विभागाला देण्यात आलेली आहे. त्यानूसार ग्रामपंचायतींचे नवीन युजर आयडी काढण्याचे काम सुरू आहे. पुढील आठ दिवसात याबाबत राज्य स्तरावरील महाआयटीकडून मंजुरी मिळाल्यावर पुढील कार्यवाही होणार आहे. दरम्यान, ग्रामपंचायतींना महाआयटी विभागाकडून नव्याने युजर आयडी मिळणार असल्याने जुन्या ऑपरेटच्या नावाने दिलेल्या युजर आयडीचे काय करायचे असा प्रश्न असून त्याबाबत निर्णय स्पष्ट नसल्याचे सुत्रांकडून सांगण्यात आले.

**निरंतर सेवा**

यापूर्वी ग्रामपंचायतीला दिलेले आपलं सेवा केंद्राचे युजर आयडी हे खाजगी ऑपरेटरच्या नावाने होते. या ऑपरेटरांनी काम बंद केले अथवा नोकरी सोडल्यानंतर ग्रामपंचायतीच्या आपलं सरकार केंद्राची अडचण होते. काही ठिकाणी तर ग्रामपंचायतमध्ये नेमलेले ऑपरेटर हे ग्रामपंचायतीसाठी दिलेल्या युजर आयडीतून खाजगी सेवा देत दाखले वितरीत करत असल्याच्या तक्रारी प्राप्त होत होत्या. मात्र, आता प्रत्येक ग्रामपंचायतीच्या नावाने युजर आयडी मिळणार असल्याने खाजगी ऑपरेटरांचा हस्तक्षेप थांबणार आहे.

### एकाच छताखाली ३८ सुविधा

- ग्रामपंचायत पातळीवर नव्याने सुरू होणाऱ्या आपलं सरकार केंद्रातून तसेच पंचायत समिती व जिल्हा परिषदेमध्ये कार्यरत असणाऱ्या आपल सरकार कक्षामधून ही सेवा देण्यात येणार असून यामुळे नागरिकांची सोय होणार आहे. यामुळे ग्रामपंचायतीच्या माध्यमातून नागरिकांना खासगी महा-ई-सेवा केंद्र, सेतू सेंटरमधून मिळणार सेवा आता एकाच ठिकाणी शासकीय विभागाच्या ३८ शासकीय विभागाच्या सेवा उपलब्ध होणार असल्याचे जिल्हा परिषद ग्रामपंचायत विभागाच्यावतीने सांगण्यात आले.